**<u>ठळक बातम्या</u>**

- संसदेचं अर्थसंकल्पीय अधिवेशन २२ जुलै पासून, २३ जुलै रोजी सादर होणार अर्थसंकल्प

- पाकिटबंद खाद्यपदार्थांच्या वेष्टणावर साखर, मीठ आणि मेदाच्या प्रमाणाची माहिती ठळक आणि मोठ्या आकारात देण्याच्या प्रस्तावाला FSSAI ची मान्यता

- ब्रिटनचे नवनिर्वाचित प्रधानमंत्री कीर स्टार्मर यांचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याकडून अभिनंदन

**आणि**

- झिम्बाब्वे विरुद्धच्या टी ट्वेंटी सामन्यात भारतीय संघाचा पराभव

**<><><><><>**

संसदेचं अर्थसंकल्पीय अधिवेशन २२ जुलैपासून सुरू होणार आहे. अर्थमंत्री निर्मला सीतारामन २३ जुलै रोजी चालू आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प सादर करतील. १२ ऑगस्टपर्यंत हे अधिवेशन सुरू राहणार असल्याची माहिती संसदीय कार्यमंत्री किरेन रीजिजू यांनी दिली आहे. तिसऱ्यांदा सत्तेत आल्यानंतर राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारचा हा पहिलाच अर्थसंकल्प आहे.

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचं आज चार दिवसांच्या ओदिशा दौऱ्यावर आगमन झालं. ओदिशाचे राज्यपाल रघुबर दास, मुख्यमंत्री मोहन चरण माझी आणि इतर मान्यवरांनी त्यांचं स्वागत केलं. राष्ट्रपती उद्या पुरी इथं भगवान जगन्नाथ, भगवान

बालभद्र, सुभद्रा देवी आणि भगवान सुदर्शन यांच्या रथ यात्रेत सहभागी होणार आहेत.

<><><><><>

रब्बी हंगामातल्या कांद्याची बाजारातली आवक वाढत असल्यामुळे कांद्याचे दर स्थिर होत असल्याचं केंद्रीय ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक वितरण मंत्रालयानं सांगितलं. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा कां्द्याचं उत्पादन कमी होऊनही देशातल्या बाजारात कांद्याची पुरेशी उपलब्धता आहे. त्याचबरोबर यंदाच्या रब्बी हंगामात कांद्याचं अंदाजित उत्पादन १९१ लाख टन असून देशातल्या ग्राहकांची गरज भागवण्यासाठी ते पुरेसं आहे, अशी माहितीही या मंत्रालयानं दिली आहे. यंदा तीन लाख ६१ हजार हेक्टर परिसरात खरिपातल्या कांद्याची लागवड करायचं उद्दिष्ट असून ते गेल्या वर्षीपेक्षा १२ टक्के जास्त असेल. त्याचबरोबर खरीप हंगामात देशात दोन लाख ७२ हजार हेक्टरवर टोमॅटोची लागवड करण्याचं उद्दिष्ट असल्याचं कृषी मंत्रालयानं सांगितलं.

<><><><><>

पाकिटबंद खाद्यपदार्थांच्या वेष्टणावर त्या पदार्थांमधली एकूण साखर, मीठ आणि मेदाच्या प्रमाणाची माहिती ठळक आणि मोठ्या आकारात देण्याच्या प्रस्तावाला भारतीय अन्नसुरक्षा आणि मानक प्राधिकरणानं मान्यता दिली. आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयानं आज ही माहिती दिली. ग्राहकांना ते वापरत असलेल्या उत्पादनाचं पौष्टिक मूल्य अधिक चांगल्या प्रकारे समजून घ्यायला आणि आरोग्यदायी निर्णय घेण्यास सक्षम करणं हे या दुरुस्तीचं उद्दिष्ट असल्याचं आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयानं म्हटलं आहे.

<><><><><>

नीट यूजी परीक्षेसंदर्भातल्या समुपदेशनाची तारीख अद्याप जाहीर झालेली नाही. त्यामुळे माध्यमांमध्ये प्रसारित झालेलं समुपदेशन पुढे ढकलल्याचं वृत्त चुकीचं असल्याचं आरोग्य मंत्रालयाने स्पष्ट केलं आहे.

**<><><><>**

पुढच्या निवडणुकीत काँग्रेस भाजपाचा पराभव करेल असा विश्वास काँग्रेसचे ज्येष्ठ नेता राहुल गांधी यांनी आज अहमदाबाद इथं काँग्रेसच्या कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना व्यक्त केला. राहुल गांधी एका दिवसाच्या गुजरात दौऱ्यावर असून त्यांनी आज राजकोट गेम झोन आगीसह विविध दुर्घटनांमधे मरण पावलेल्यांच्या कुटुंबियांची भेट घेतली.

**<><><><>**

उत्तर प्रदेशातल्या हथरस चेंगराचेंगरी प्रकरणातला मुख्य आरोपी देवप्रकाश मधुकर याला न्यायदंडाधिकारी न्यायालयानं १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी दिली आहे. काल संध्याकाळी त्याला दिल्लीत अटक केल्यानंतर आज पोलिसांनी त्याची वैद्यकीय तपासणी केली आणि त्याला न्यायालयात हजर केलं. या प्रकरणात रामप्रकाश शाक्य आणि संजू यादव या आणखी दोन आरोपींना आज अटक झाली.

**<><><><>**

बहुजन समाज पार्टीचे तामिळनाडूचे प्रदेशाध्यक्ष के आर्मस्ट्राँग यांच्या हत्येप्रकरणी चौकशी करून पोलीस अधिकाऱ्यांनी दोषींवर कारवाई करण्याचे आदेश तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम के स्टॅलिन यांनी दिले आहेत. काल झालेल्या या हत्येनंतर पोलिसांनी काही तासातच आठ जणांना अटक केल्याचं त्यांनी सांगितलं.

दरम्यान, द्रमुक सरकार राज्यात कायदा आणि सुव्यवस्था राखण्यात अपयशी ठरल्याची टीका केंद्रीय राज्यमंत्री डॉ एल मुरुगन यांनी केली आहे.

**<><><><><>**

काश्मीर खोऱ्यात कुलगाम जिल्ह्यातल्या मोदरगाम गावात आज दुपारी दहशतवादी आणि सुरक्षा दलात चकमक **उडा**ली. पोलीस, सैन्यदल आणि केंद्रीय राखीव पोलीस दलानं या भागात दहशतवादी लपून बसल्याच्या माहितीनंतर घेराव घालत संयुक्त शोध मोहिम राबवली. संशयित परिसरात पोलीस आणि सुरक्षा दल येताच दहशतवाद्यांनी त्यांच्यावर गोळीबार केला. प्रत्युत्तरादाखल सुरक्षा दलानंही गोळीबार केला.

**<><><><><>**

भारतीय शेअर बाजार नवे उच्चांक गाठत असल्याच्या पार्श्वभूमीवर जून २०२४ मध्ये ४२ लाखांहून अधिक नवीन डी मॅट खाती उघडली आहेत. केंद्रीय डिपॉझिटरी सर्व्हिस आणि नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी यांनी ही माहिती दिली आहे. यामुळे, डी मॅट खात्यांची एकूण संख्या आता १६ कोटीवर पोहोचली आहे. एका महिन्यात ४० लाखांहून अधिक नवीन डी मॅट खाती उघडण्याची ही चौथी वेळ आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज कीर स्टार्मर यांच्याशी संवाद साधला आणि त्यांचं ब्रिटनच्या प्रधानमंत्रीपदी निवड झाल्याबद्दल अभिनंदन केलं. दोन्ही देश नागरिकांची प्रगती, समृद्धी आणि वैश्विक कल्याणासाठी व्यापक धोरणात्मक भागीदारी आणि मजबूत भारत-ब्रिटन आर्थिक संबंध वृद्धींगत करण्यासाठी वचनबद्ध आहेत, असं प्रधानमंत्री मोदी यांनी या चर्चेविषयी म्हटलं आहे. परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी आज ब्रिटनचे परराष्ट्र सचिव डेविड लॅमी यांच्याशी चर्चा केली.

दोन्ही देशांतील सर्वसमावेशक धोरणात्मक भागीदारी वृद्धींगत करण्याच्या वचनबद्धतेची ग्वाही उभयतांनी दिली.

<><><><>

इराणच्या राष्ट्राध्यक्षपदाच्या सार्वत्रिक निवडणुकीत सुधारणावादी नेते आणि माजी आरोग्यमंत्री मसूद पेजस्कियान विजयी झाले आहेत. त्यांनी इस्लामी मूलतत्त्ववादी सईद जलीली यांचा पराभव केला. काल दुसऱ्या फेरीत झालेल्या मतदानात एकूण तीन कोटी मतांपैकी पेजस्कियान यांना १ कोटी ६३ लाख मतं पडली. इराणची निवडणूक २०२५ मध्ये होणार होती, मात्र मे महिन्यात राष्ट्राध्यक्ष इब्राहिम रईसी यांचं अपघाती निधन झाल्यानं निवडणूक घेण्यात आली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी पेजस्कियान यांचं अभिनंदन केलं आहे. भारत आणि इराणमधील संबंध दृढ आणि वृद्धिंगत करून उभय देशांच्या नागरिकांच्या कल्याणासाठी एकत्र काम करण्याची अपेक्षा मोदी यांनी समाजमाध्यमाद्वारे व्यक्त केली.

<><><><>

आसाममधल्या पुराच्या दुसऱ्या लाटेमुळे २४ लाखांहून अधिक लोक बाधित झाले आहेत. प्रशासनाकडून बचाव आणि मदतकार्य सुरू आहे. अनेक मंत्र्यांनी पूरग्रस्त भागांना भेटी दिल्या आहेत. गुवाहाटीतल्या काही भागांमध्ये पाणी साचले आहे. पुराच्या पाण्यामुळे पिकांसह मालमत्तेचं मोठं नुकसान झालं आहे. राष्ट्रीय उद्यान आणि वन्यजीव अभयारण्यातील प्राण्यांनाही पुराचा फटका बसला आहे. काझिरंगा अभयारण्यातील सहा गेंड्यांसह ११४ वन्यजीव दगावल्याचं वृत्त आहे.

<><><><>

झिम्बाब्वे विरुद्धच्या टी - ट्वेंटी मालिकेतल्या पहिल्याच सामन्यात भारतीय संघाला पराभव पत्करावा लागला. झिम्बाब्वेमधल्या हरारे इथं शेवटच्या षटकापर्यंत

खेळल्या गेलेल्या सामन्यात भारतीय संघाला १३ धावांनी पराभव पत्करावा लागला. दिग्गज खेळाडूंच्या अनुपस्थितीत कर्णधार शुभमन गिलच्या नेतृत्वाखाली भारतीय संघ या सामन्यात उतरला होता. नाणेफेक जिंकून भारतीय संघानं झिम्बाब्वेला फलंदाजीला पाचारण केलं. झिम्बाब्वेकडून कुठलाही खेळाडू मोठी धावसंख्या उभारू शकला नाही. निर्धारित २० षटकात झिम्बाब्वेनं ९ बाद ११५ धावा केल्या. रवि बिश्नोईनं सुरेख गोलंदाजी करत चार गडी बाद केले. ११६ धावांच लक्ष्य घेऊन आलेल्या भारतीय संघाची सुरुवात खराब झाली. शुभमन गिल, वॉशिंग्टन सुंदर आणि अवधेश खान वगळता एकाही खेळाडूला दोन आकडी धावा करता आल्या नाही. १९ षटक आणि ५ चेंडूत भारताचा पूर्ण संघ १०२ धावांवर बाद झाला.

<><><><><>

चीनच्या शॅडोन्ग परगण्यातल्या हेझ शहरात झालेल्या जोरदार वादळामुळे पाचजण मृत्युमुखी पडले तर ८८ जण जखमी झाले. डोन्गमिन्ग आणि ज्युआनचेंग या भागांना वादळाचा तडाखा बसल्याचं स्थानिक प्रशासनानं सांगितलं.

<><><><><>

कॅनडा खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या प्रियांशु राजावतनं जागतिक क्रमवारीत चौथ्या स्थानावर असलेल्या अँटोसेनचा उपांत्य पूर्व सामन्यात पराभव करत उपांत्य फेरीत धडक मारली. काल रात्री एक तास आणि १९ मिनिटं चाललेल्या या चुरशीच्या सामन्यात राजावतनं २१-११, १७-२१, २१-१९ असा सरळ गेममधे विजय मिळवला. उपांत्य सामन्यात त्याची लढत फ्रान्सच्या अलेक्स लॅनियर याच्याशी होईल.

<><><><><>

विम्बल्डन टेनिस स्पर्धेतल्या पुरुष दुहेरीत भारताचा रोहन बोपन्ना आणि त्याचा ऑस्ट्रेलियन जोडीदार मॅथ्यू एबडन यांचा सामना जर्मनीच्या हेंड्रिक जीबीन्स आणि कॉन्स्टॅनटिन फ्रॅन्टझन यांच्याशी आज होणार आहे.

//<><><><><>//